**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३५/२०२०** **दिनांक ०१/०५/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २५/०४/२०२० ते ०१/०५/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक ०२/०५/२०१९ सकाळी ८:३० पासून ०६/०५/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२५/०४** | **२६/०४** | **२७/०४** | **२८/०४** | **२९/०४** | **३०/०४** | **०१/०५** | | **०२/०५** | **०३/०५** | **०४/०५** | **०५/०५** | **०६/०५** |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ९ | ४ | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३५ | ३६ | ३६ | ३७ | ३७ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २८ | २८ | २८ | २८ | २७ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | २ | १ | २ | २ | ० |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८० | ७४ | ६५ | ७२ | ८२ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३५ | ३४ | ३३ | ३२ | ३० |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ५ | ५ | ५ | ४ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै. | वा.प. | नै.प. | आ.द. | नै.द. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **०.०** | **०.०** | **४२३३.४** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २ व ३ मे २०२० रोजी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून कमाल व किमान तापमानात वाढ संभवते तसेच आकाश निरभ्र राहील.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **फळ प्रक्रिया** | **-** | • कोव्हीड -१९ अर्थात कोरोनाच्या उद्रेकामुळे उत्पादित फळांचे विपणन करण्यात अडचण निर्माण झाली असल्याने शेतीमालाचे नुकसान कमी करण्यासाठी फळ प्रक्रिया केल्यास फळांचे नुकसान कमी करता येणे शक्य आहे. यामध्ये कच्च्या आंब्यापासून लोणचे आणि चटणी, फणसापासून तळलेले गरे, फणस पोळी इ., उपलब्ध पक्व काजू बोंडापासून सिरप, करवंदापासून लोणचे, चटणी आणि सिरप इ., पिकलेल्या कोकमापासून आमसूल, सिरप आणि आगळ इ., जांभूळापासून सिरप आणि चिकू फळापासून चिकू पावडर इत्यादी टिकावू पदार्थ तयार करून संभाव्य नुकसान काही प्रमाणात कमी करता येईल.<br>• सदर फळप्रक्रिया बाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील फार्मर कॉर्नर या उपविभागामध्ये उपलब्ध आहे (www.dbskkv.org.in). |
| **उन्हाळी भात** | **पक्वता** | • भात पक्व होवू लागल्यास कापणी करण्यापूर्वी शेतातील पाणी काढून टाकावेत.<br>• तयार झालेल्या भात पिकाची 'वैभव" विळ्याने जमिनीलगत कापणी करून मळणी करून ३ ते ४ उन्हे देऊन धान्य वाळवावे. |
| **आंबा** | **फळधारणा** | • दिनांक २ व ३ मे २०२० रोजी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर पाऊसाचा अंदाज घेवून काढणी करावी. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान १५ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये तसेच फळे काढणीस तयार होण्याच्या एक महिना अगोदर झाडास पाणी देण्याचे बंद करावे.<br>• फळकूज ह्या काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• आंबा बागेत फळमाशी तसेच फळे पोखरणारी अळी इ. किडीच्या प्रादुर्भावामुळे गळलेली फळे वेळोवेळी गोळा करून नष्ट करावीत व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी. पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• आंबा नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. १० x १० मीटर अंतरावर व घन पध्दतीने लागवडीसाठी ५ x ५ मीटर अंतरावर १ x १ x १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि तीन ते चार घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. |
| **आंबा** | **-** | • आंबा फळांची काढणी झाल्यावर घन लागवड (५ **x** ५ मी. किंवा ६ **x** ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये नियमित |

| | | |
|---|---|---|
| **घन लागवड** | | छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी. |
| **काजू** | **फळधारणा** | • पूर्ण तयार झालेल्या काजू बियांची काढणी करावी. काढणी केलेल्या बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवून हवाबंद आणि कमी आर्द्रता असलेल्या ठिकाणी साठवणूक करावी.<br>• नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना दर आठ दिवसांनी प्रती कलम १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी. तसेच कलमांच्या आळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यासाठी आळ्यामध्ये वाळलेले गवत, पालापाचोळा किंवा पोलीथीनचे आच्छादन करावे.<br>• काजू नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. ७ x ७ मीटर किंवा ८ x ८ मीटर अंतरावर ०.६ x ०.६ x ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि दीड ते दोन घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि अर्धा किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. |
| **नारळ** | **फळधारणा** | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी.<br>• नारळ नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. ७.५ x ७.५ मीटर किंवा ८ x ८ मीटर अंतरावर १ x १ x १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि १० किलो **चांगले कुजलेले शेणखत** आणि २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत.<br>• पाणी सुकलेले तयार नारळ फोडून नारळाच्या वाट्या काढून घ्याव्यात व त्या कमीत कमी ३ दिवस उन्हामध्ये वाळवून त्यापासून सुके खोबरे तयार करावे. |
| **चिकू** | **फळधारणा** | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा.<br>• चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे गोळा करून जाळून नष्ट करावीत आणि बाग स्वच्छ ठेवावी.<br>• चिकू नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात १० **x** १० मीटर अंतरावर १ **x** १ **x** १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि तीन ते चार घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि २.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. सूचना : अर्धवट कुजलेले शेणखत वापरल्यास कलमांना वाळवीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. |
| **दुभती जनावरे** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• जनावरांवर गोचीडांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी गोठयाची स्वच्छता राखावी व पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली डेल्टामेथ्रीन २ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून संपूर्ण अंगावर द्रावण फवारावे. जनावरे औषध चाटणार नाही, याकरिता फवारणी पूर्वी जनावराला पाणी पाजावे. |
| **कुकुटपालन** | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे व रात्रीच्या वेळी पाणी मिळेल याची काळजी घ्यावी. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे.<br>• पक्ष्यांना रानीखेत रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**